दाखल दिनांकः- ०५/०२/२०१८
नोंदविल्याचा दिनांकः- ०५/०२/२०१८
निकाल दिनांकः- २१/०३/२०१८
कालावधीः- ००व.०१म.१६दि.

**लांजा येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, लांजा,यांचे न्यायालयात,**

**ता. लांजा, जि. रत्नागिरी.**

(पीठासीन अधिकारी डी.एम.हिंग्लजकर)

**दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक १/२०१८**

**निशाणः–**

१. जयदिप राजेंद्र कदम,
उ.व.सु.२८, धंदा - नोकरी,
२. निलम राजेंद्र कदम,
उ.व.सु.२६, धंदा - गृहिणी,
३. जगदिश राजेंद्र कदम,
उ.व.सु.२४, धंदा - नोकरी,
सर्व रा. उपळे, ता. लांजा,
जि.रत्नागिरी. .........................अर्जदार

विरुध्द

कोणीही नाही. ...........................सामनेवाला.

वारस प्रमा**णपत्र मिळणेसाठी अर्ज.**

उपस्थितीः-
अर्जदारांतर्फे विधीज्ञ – श्री.एम.एम.बंडबे,
सामनेवाला – कोणीही नाही.

## न्यायनिर्णय

**(पारित दिनांक २१/०३/२०१८)**

१. अर्जदार यांनी हा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी केला आहे.

२. अर्जदार यांच्या अर्जाची थोडक्यात हकिकत अशी की,

अर्जदार हे मौजे उपळे, ता. लांजा, जि. रत्नागिरी येथील कायमचे रहिवाशी

असून अर्जदार नं. १ व ३ हे सख्खे भाऊ व अर्जदार नं.२ ही सख्खी बहिण आहे. अर्जदार यांची आई दिनांक २४/१२/१९९९ रोजी मयत झाली आहे. अर्जदार यांचे वडील राजेंद्र दाजी कदम हे बृहन्मुंबई महानगर पालिका येथे मार्केट डिपार्टमेंट येथे सफाई कामगार या पदावर नोकरीस होते. ते दिनांक १५/०९/२००९ रोजी नोकरीवर असताना त्यांचा अपघात झाल्यामुळे ते अपंग झाले व त्यांना सेवेतून कमी करणेत आले. त्यानंतर अर्जदार यांचे वडिल उपचारासाठी मौजे उपळे, ता. लांजा येथे कायमचे वास्तव्यासाठी स्थायीक झाले. अर्जदाराचे वडील दिनांक १६/०९/२०१० रोजी त्यांचे मौजे उपळे येथील राहते घरी मयत झाले. मयत राजेंद्र दाजी कदम यांना अर्जदार नं.१ ते ३ हे कायदेशीर वारस असून त्यांना अन्य कोणीही वारस नाहीत. अर्जदारांचे वडिलांचे निधनानंतर अर्जदार यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट झाली.त्यामुळे, अर्जदार नं.१ यांनी बृहन्मुंबई महानगर पालिकाचे मार्केट डिपार्टमेंट येथे वडिलांचे नोकरीचे ठिकाणी अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणेसाठी अर्ज केला. अर्जदार नं.१ यांना अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणेस अर्जदार नं. २ व ३ यांची पूर्ण संमती आहे. परंतु, बृहन्मुंबई महानगर पालिकेचे मार्केट डिपार्टमेंटचे संबंधित अधिकारी यांनी अर्जदार यांचेकडे वारस दाखल्याची मागणी केली. त्यामुळे, अर्जदार ही मयत राजेंद्र दाजी कदम यांचे वारस आहेत, असा दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी हा अर्ज दाखल केला आहे.

३. अर्जदार यांचे अर्जास कोणाचीही हरकत आहे किंवा कसे?, हे समजण्यासाठी मंगळवार दिनांक १३/०२/२०१८ रोजीचे दैनिक ''रत्नागिरी टाईम्स'' या रत्नागिरी जिल्हयातील वृत्तपत्रामध्ये जाहीर नोटीस प्रसिध्द करणेत आली. या वृत्तपत्राची अस्सल प्रत निशाण १५ वर आहे. तसेच, कोर्टाचे, तहसिलदार कार्यालय, लांजा, पंचायत समिती लांजा, यांचे नोटीस बोर्डवर तसेच मयत राजेंद्र दाजी कदम राहत असलेल्या उपळे गावातील ग्रामपंचायत कार्यालयात सार्वजनिक ठिकाणी जाहीरनामा चिकटवून जाहीर प्रकटन करण्यात आले. तसा बेलीफ यांचा रिपोर्ट निशाण १२ वर आहे. याप्रमाणे जाहीर नोटीस व जाहीरनामा प्रसिध्द करुनही कोणाही इसमाने या कामी हजर होऊन अर्जदार यांचे अर्जास आक्षेप घेतलेला नाही.

४. अभिलेखातील कागदपत्रे पाहिली. अर्जदार तर्फे विधीज्ञ श्री.एम.एम.बंडबे यांचा युक्तिवाद ऐकला.

५. अभिलेखातील कागदपत्रे पाहिल्यानंतर व अर्जदारतर्फे विधीज्ञ यांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित होतात. ते मुद्दे व त्यावरील कारणमिमांसेसहित निष्कर्ष खालील प्रमाणेः—

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| १. मयत राजेंद्र दाजी कदम यांना अर्जदार क्रमांक १ ते ३ हे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र मिळणेस अर्जदार हक्कदार आहेत काय ? | ........................होय. |
| २. अंतिम आदेश काय ? | .........................अर्ज मंजूर करणेत येत आहे. |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्रमांक १ बाबतः–

६. अर्जदार क्रमांक १ यांनी त्यांचे अर्जाचे पुष्टयर्थ निशाण १६ वर सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

७. अर्जदार यांनी त्यांचे अर्जाचे पुष्टयर्थ पुराव्या दाखल निशाण ८ वर मयत राजेंद्र दाजी कदम यांचे मृत्यू प्रमाणपत्र, निशाण ९ वर रुपाली राजेंद्र कदम यांचा मृत्यू दाखला, निशाण २० वर सरपंच, ग्रामपंचायत उपळे यांनी राजेंद्र दाजी कदम हे दिनांक १६/०९/२०१० रोजी मयत झाले असून त्यांना अर्जदार नं.१ ते ३ हे वारस असल्याबाबत दिलेला दाखला, निशाण २१ वर पोलीस पाटील, उपळे यांनी राजेंद्र दाजी कदम हे दिनांक १६/०९/२०१० रोजी मयत झाले असून त्यांना अर्जदार नं.१ ते ३ हे वारस असल्याबाबत दिलेला दाखला, निशाण २२ वर बृहन्मुंबई महानगर पालिका बाजार विभाग तर्फे प्रशासकीय अधिकारी यांनी अर्जदार नं.१ यांना वारस प्रमाणपत्र मागणीबाबत दिलेले स्मरणपत्र, असे कागद दाखल केले आहेत.

८. अभिलेखातील कागदपत्रांचे अवलोकन केले. निशाण ८ वरील मृत्यू प्रमाणपत्र पाहिले असता राजेंद्र दाजी कदम हे दिनांक १६/०९/२०१० रोजी उपळे, ता.लांजा, जि.रत्नागिरी येथे मयत झाल्याचे स्पष्ट होते. निशाण ९ वरील मृत्यू प्रमाणपत्र पाहिले असता अर्जदार अर्जदार यांची आई रुपाली राजेंद्र कदम ह्या दिनांक २४/१२/१९९९ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. अर्जदार यांनी त्यांचे अर्जात व अर्जदार नं.१ यांनी त्यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्रात राजेंद्र दाजी कदम हे दिनांक १६/०९/२०१० मयत असून त्यांना अर्जदार क्रमांक १ व ३ मुलगे व अर्जदार क्रमांक २ ही मुलगी या नात्याने वारस असल्याबाबत कथन केले आहे. अर्जातील कथनांबाबत कोणीही वाद केलेला नाही. त्यामुळे, ती कथने अबाधित राहिली आहेत.

९. निशाण २० व निशाण २१ वरील अनुक्रमे सरपंच व पोलीस पाटील, उपळे यांनी दिलेले दाखले पाहता राजेंद्र दाजी कदम हे दिनांक १६/०९/२०१०

रोजी मयत झाल्याचे व त्यांना अर्जदार नं. १ ते ३ हे वारस असल्याचे दिसून येते. निशाण २२ वरील बृहन्मुंबई महानगर पालिका, बाजार विभागचे प्रशासकीय अधिकारी यांनी अर्जदार क्रमांक १ यांना दिलेले पत्र पाहता त्यांनी अर्जदार यांचेकडून मयत राजेंद्र दाजी कदम यांचे वारस प्रमाणपत्राबाबत मागणी केल्याचे दिसून येते.

१०. एकंदरीत अभिलेखातील कागदपत्रे ही अर्जदार यांनी त्यांचे अर्जात केलेल्या कथनांस पुष्टी देतात. अर्जदार यांच्या कथनास कोणाही इसमाने या कामी हजर होऊन विरोध केलेला नाही. अभिलेखातील कागदपत्रे पाहिली असता अर्जदार यांच्यावर विश्वास ठेऊ नये, असा सकृतदर्शनी पुरावा अभिलेखात नाही. त्यामुळे, अर्जदार क्रमांक १ ते ३ हे मयत राजेंद्र दाजी कदम यांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र अर्जदार यांना देण्यास कोणतीही अडचण नाही. सबब, मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्रमांक २ बाबतः–**

११. वर नमूद केलेल्या विवेचनावरुन मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. अर्जदार यांचा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. अर्जदार क्रमांक १ ते ३ हे मयत राजेंद्र दाजी कदम यांचे सरळ व कायदेशीर वारस आहेत, असे वारस प्रमाणपत्र अर्जदार यांना देण्यात यावे.

३. अर्जदार यांनी दिवाणी नियमावली मधील परिच्छेद क्रमांक ३१२ अन्वये वारस प्रमाणपत्र दिले तारखेपासून सहा महिन्यांचे आत किंवा वेळोवेळी मुदत वाढ दिली असेल त्या कालावधीत न्यायालयाला या प्रमाणपत्राअंतर्गत मिळणारी सर्व मालमत्ता इत्यादी नोंदीबाबत खरा व योग्य लेखाजोखा दयावयाचा आहे आणि तसेच, त्या तारखेपासून पुढील एक वर्षात किंवा न्यायालयाने दिलेल्या मुदतीत न्यायालयात मालमत्ताबाबतीत खरा व योग्य लेखाजोखा, त्यात तुमच्याकडे आलेली मालमत्ता किंवा मालमत्तेची कशी विल्हेवाट, त्याबाबतीत दर्शविणारे सर्व हिशोब सादर करावेत.

–

**दिनांकः– २१/०३/२०१८ .** **(डी.एम.हिंग्लजकर)**
**ठिकाणः– लाजा.** **दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, लांजा,**
**जि.रत्नागिरी.**

Case No : RCS No. 1 of 2018
I affirm that the contents of this pdf file Judgment are same words as per original Judgment,
Name of the Stenographer:Y.S.Lahute
Court Name: Civil & Criminal Court, Lanja, Dist. Ratnagiri.
Date of decision :21/03/2018
Judgment signed by P.O.on : 21/03/2018
Judgment uploaded on : 21/03/2018